# दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट बँक)

**मुख्य कार्यालय :** प्लॉट क्र. 471/472, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-411037.
फोन : (020) 24261755/24262745,
ईमेल : vsbl@vishweshwarbank.com संकेत स्थळ : www.vishweshwarbank.com

## 51 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (केवळ सभासदांसाठी)

दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे या बँकेची 51वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. 26 जुलै 2022 रोजी सायं. 5.00 वाजता 'कै. एस. एम. जोशी सभागृह' 191/192, नवी पेठ, गांजवे चौक, पत्रकार भवन शेजारी, पुणे - 411030 या ठिकाणी खालील विषयावर विचार करुन निर्णय घेण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

### सभेपुढील विषय

1. दि. 27 सप्टेंबर 2021 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. मा. संचालक मंडळाने तयार केलेला वर्ष 2021-22 चा वार्षिक अहवाल व दि. 31 मार्च 2022 अखेरचा ताळेबंद आणि वर्ष 2021-22 चे नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे व सभासदांकडून अहवालासंबंधी आलेल्या लेखीप्रश्न/ सूचनांचा विचार करणे.
3. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वर्ष 2021-22 च्या नफा विभागणीची नोंद घेणे व मंजूरी देणे.
4. मा. वैधानिक लेखापरीक्षक मे. गोगटे अॅण्ड कं. यांच्याकडून प्राप्त झालेल्या वर्ष 2021-22 च्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालाची व वर्ष 2020-21 च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेणे.
5. आर्थिक वर्ष 2022-23 साठी रिझर्व्ह बँकेच्या पूर्व मान्यतेने मा. वैधानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.
6. आर्थिक वर्ष 2022-23 साठी मा. संचालक मंडळाने मा. स्थानिक लेखापरिक्षकांच्या केलेल्या नियुक्तीस व मेहनतान्यास मान्यता देणे व वर्ष 2023-24 साठी स्थानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करण्याचे व मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.
7. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 कलम 39(3) नुसार, बँकेचे मा. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना वर्ष 2021-22मध्ये दिलेल्या कर्जांची माहिती घेणे.
8. आर्थिक वर्ष 2021-22 मध्ये मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या एक रकमी कर्ज परतफेड प्रस्तावांची नोंद घेणे.
9. वर्ष 2022-23 साठी एक रकमी कर्ज परतफेड योजनेस मान्यता देणे.
10. विद्यमान पोटनियमांमध्ये सुचविलेल्या दुरुस्त्यांना मान्यता देणे.
11. बँकेच्या दीर्घकालीन उद्दीष्टे, वार्षिक व्यवसाय योजना आणि वार्षिक अंदाज पत्रकाची नोंद घेवून त्यास मान्यता देणे.
12. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
13. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 कलम 39 (1) (I) नुसार, बँकेचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नात्यातील सेवकांच्या सूचीची नोंद घेणे.
14. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन,**

**स्थळ :** पुणे

**दिनांक :** 12 जुलै 2022

**श्रीराम वि. आपटे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सूचना :** गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी दुपारी 5.30 वाजता घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचे कामकाज होईल.